सिंधुदुर्ग फाईल

110429FT0297

महाराष्ट्र शासन

☎ २२८५ २६९६
२२०२ ५९४६
२२८१ ३९४७

क्र. ईएनव्ही-२०११/प्र. क्र. १५/तां. क. १,
पर्यावरण विभाग, मंत्रालय.
१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २१ एप्रिल, २०११

प्रति

प्रधान सचिव,
पर्यटन विभाग, मंत्रालय.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय.

सचिव,
पर्यावरण विभाग, मंत्रालय.

सदस्य सचिव,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.

विषय : सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन समितीच्या दि. ७ एप्रिल, २०११ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

महोदय,

सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन समितीची बैठक दि. ७ एप्रिल, २०११ रोजी प्रधान सचिव (पर्यटन) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचे इतिवृत्त कृपया माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत पाठवीत आहे.

आपला,

(ग. नि. वराडे)
संचालक

SRO-T
Pl. plu
28/4

D:\Sindhu Minutes.doc

पर्यावरण विभाग

सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन समितीसमोर सचिव, पर्यटन विभाग, यांच्या अध्यक्षतेखाली दि. ७ एप्रिल, २०११ रोजी झालेले सादरीकरण व बैठकीचे इतिवृत्त

सदर बैठकीस खालील अधिकारी व मान्यवर उपस्थित होते :-

१. श्री. आनंद कुलकर्णी, सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
२. श्री. ए. एम. खान, प्रधान सचिव (उद्योग), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग
३. श्री. राधेश्याम मोपलवार, सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
४. श्री. ग. नि. वराडे, संचालक, पर्यावरण विभाग
५. श्री. अजय देशपांडे, झोनल ऑफिसर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

सदर बैठकीमध्ये मेसर्स क्रिएटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग सोल्यूशन्स प्रा. लि., तसेच काथ तयार करणारे उद्योग व स्टोन क्रशरच्या प्रस्तावावर चर्चा झाली. व खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले :-

१. मेसर्स क्रिएटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग सोल्यूशन्स प्रा. लि. हा उद्योग सर्व्हे नं. १०८-ए, मौजे बांदा, तालुका सावंतवाडी, जिल्हा सिंधुदुर्ग येथे प्रस्तावित आहे. हा उद्योग सुमारे १०० व्हील लोडर्स प्रतिमहिना तयार करणार आहे. हे व्हील लोडर तयार करण्यासाठी इतरत्र उत्पादन केलेले वेगवेगळे भाग सदर उद्योग ॲसेंबल करणार आहे. या उद्योगापासून औद्योगिक सांडपाणी अंदाजे १ क्यु.मी. व घरगुती सांडपाणी ५ क्यू.मी./दिन निर्माण होणार आहे. सबब, व्हील लोडर्सचे भाग उत्पादन न करण्याच्या तसेच उद्योगांना घरगुती सांडपाणी तसेच औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया यंत्रणा बसवून विहित मर्यादेपर्यंत प्रक्रिया करण्याच्या अटींना अधीन राहून सदर उद्योगास परवानगी देण्याचे ठरले.

२. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये स्थानिक कच्च्यामालाची उपलब्धता असल्यामुळे काथ तयार करण्याचे लहान कारखाने मोठ्या प्रमाणात आहेत. या कारखान्यांमध्ये खैर या झाडापासून काथ तयार करण्यात येतो. औद्योगिक सांडपाणी हे काथ तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या भांड्यांच्या धुण्यामुळे निर्माण होते. त्यामुळे केमीकल प्रक्रिया संभवत नाही व त्यामुळे ज्या काथ तयार करणाऱ्या कारखान्यांमध्ये रासायनिक प्रक्रियेचा वापर होत नाही अशा काथ कारखान्यांना परवानगी देण्याचे ठरले. तथापि, अशा

उद्योगांनी उत्पादन प्रक्रियेमध्ये वापरण्यात येणाऱ्या बॉयलरच्या चिमणीची उंची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने विहित केल्याप्रमाणे असावी तसेच औद्योगिक सांडपाण्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने विहित केल्याप्रमाणे प्रक्रिया यंत्रणा असावी.

३. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये स्टोन क्रशरसाठी सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन समितीच्या परवानगीची आवश्यकता नाही असे दि. २१ फेब्रुवारी, २०११ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ठरले आहे. तथापि, उद्योग विभाग दि. २६-४-२००१० रोजीच्या शासन निर्णयानुसार ज्या उद्योगाचा परिशिष्ट १ किंवा २ मध्ये समावेश नाही, अशा उद्योगांना सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन समितीची परवानगी घ्यावी, असे नमूद केले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील स्टोनक्रशरसाठी पर्यावरण विभागाच्या दि. २-११-२००९ च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्यांच्या स्तरावर हवा व जल प्रदूषणाच्या विहित अटी घालून परवानगी द्यावी व स्टोनक्रशिंगचे प्रस्ताव सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन समितीपुढे सादर करण्यात येऊ नये, असे ठरले.

४. काही उद्योग, ज्यांचा समावेश उद्योग विभागाच्या दि. २६-४-२०१० रोजीच्या शासन निर्णयामध्ये परिशिष्ट १ किंवा २ मध्ये नाही, अशा उद्योगांना सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन समितीसमोर प्रस्ताव सादर करण्याची तरतूद आहे. तथापि, काही उद्योग जसे, वर नमूद केल्याप्रमाणे स्टोनक्रशिंग, काथ तयार करणे, छोटे इंजिनीयरिंग उद्योग ज्यामध्ये औद्योगिक सांडपाणी निर्माण होत नाही, अशा उद्योगाची स्वतंत्र सूची तयार करुन पर्यावरण विभागाकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पाठवावी, असे ठरले. पर्यावरण विभागाने उद्योग विभागाकडे स्वतंत्र सूची पाठवून सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन समिती च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे किंवा काय ही बाब तपासून पहावी.

मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

- - - - - - -